# उनाड



ई साहित्य प्रतिष्ठान

आपल्याकडे सर्वात उनाड
कोण आहे ? मी सांगू ?
तुम्ही आम्ही जिच्या आधाराने
स्वतःला सुरक्षित मानतो ती.

जिच्या मुळे आपण जिवंत आहोत ती . जिने आपल्याला जन्म दिला ती . आणि मेल्यावर जिच्यात आपण सामावणार ती. आपली पृथ्वी. सदा गरागरा फ़िरणारी . स्वतः भोव ती गिरक्या घेत . सुर्याभोवती फ़िरक्या घेत . सुर्याबरोबरोबर पळत. सदा सर्वकाळ पळणारी पृथ्वी.

जगात कायम काही असेल तर ही गती. सतत चालणं . सतत बदलणं . सृष्टीचा नियमच आहे. पण यातही दोन प्रकारचे लोक असतात. एक जे एकाच कक्षेत फ़िरत रहातात . आणि दुसरे जे स्वतःच्या कक्षांनाच चॅलेंज करत उनाडक्या करायला बाहेर पडतात . आम्ही या दुसर्यायप्रकारच्या उनाड लोकांसाठी एक व्यासपीठ उभं करतोय.

असे लोक ज्यांना या एका जन्मात काहीतरी जगावेगळं करायची आस लागली आहे. असे लोक ज्यांच्या डोक्यात कायम भन्नाट मेंदू गिरक्या आणि फ़िरक्या घेत असतो. असे लोक जे मनातल्या या जिप्सीच्या आदेशावर उन्हातान्हात बाहेर पडतात . असे लोक जे आतल्या आवाजाच्या हुकुमानुसार रात्र अपरात्री नवनवे प्रयोग करायला बाहेर पडतात. अशा कल्पना ज्यांना सामान्य लोक वेडगळ म्हणतात . अशा अकल्पित घटना ज्यांना सामान्य लोक समजूच शकत नाहीत. या जीवनाला ओझं समजून सर्वसामान्य लोक जेव्हा बेडा पार करायची चिंता करत असतात तेव्हा हे लोक याच जीवनातून काहीतरी भव्य दिव्य करायला निघतात . व्यवहाराच्या नियमांत न बसणारे हे जीवनाचे शेअर दलाल स्वतःचं जीवन उधळलेल्या वारूसारखं भन्नाट हवेवर सोडून देतात.

मग हे कधी **बिल गेट्स**
बनतात तर कधी **भगतसिंग**.
कधी **बाबा आमटे** बनतात
तर कधी **स्टीव्ह जॉब्स**. कधी
**चे गव्हेरा** बनून बोलिव्हियाच्या
जंगलात शहीद होतात , तर कधी एखादा
**मायकल जॅक् सन** सगळ्या जगाला आपल्या
गाण्या आणि नाचाने वेड लावतो. कोणी **डार्विन**
आयुष्यभर किड्यांचा अभ्यास करत करत
जगाला एक नवीन सिद्धांत देतो तर
वंशवादाला मूठमाती देणारे **मार्टिन ल्युथर किंग**
आणि **नेल्सन मंडेला** सारखे लोक आयुष्यभर
हालअपेष्टा भोगत खडतर जीवनातच आनंद
मानतात. या लोकांची भूक कधी शमत नाही .
या लोकांची पावलं कधी थांबत नाहीत.
हे लोक परग्रहावरून ना ही येत . आपल्याच
अवतीभवती असतात . पण बी बघून त्याचा
वृक्ष कसा होणार ते आम लोकांना कळत नाही
तसंच आपल्या अजूबाजूला धडपडणारी ही मुलं
लोकांना रोजच्या रोजी रोटीच्या धावपळीत
दिसतच नाहीत.

अहो दुसर्यां चं कशाला.
कधी कधी आपल्याच
सुपीक डोक्यातून एखादी
भन्नाट कल्पना उगवते. पण
ही कल्पना भन्नाट आहे आणि
याचा वटवृक्ष होऊ शकतो याची
कल्पना आपल्यालाच येत नाही . मग आपण
अशी कल्पना त्याच भुसभुशीत मेंदूत दाबून
टाकतो. एखाद्या नाटकाची कल्पना , एखाद्या
व्यवसायाची आयडिया , एखाद्या यंत्राची
डिझाईन. आजूबाजूचे लोक आपल्याला येडपट
म्हणतील म्हणून आपण ती रद्दीत टाकून देतो .
लोक-लज्जेस्तव आपण शिंक दाबून ठेवतो
तसं.
पण आजपासून आपल्याला उनाड भेटलंय .
आपल्या मनात येणारे हे कक्षेबाहेरचे विचार
आणि आपलाला भेटणारी कक्षेबाहेरची माणसं
जगासमोर आणण्यासाठी एक व्यासपीठ.
बघूयाच हे उनाड बाळ काय गुल खिलवतं ते.

**- नाम गुम जायेगा**

**ई-साहित्य प्रतिष्ठान**

*तुझ्या, माझ्या, याच्या, त्याच्या,*
*प्रत्येकाच्या मनात क्षणाक्षणाला*
*बरंच काही उमटत असतं ..*
*स्पष्ट, अस्पष्ट*
*स्पष्ट म्हणजे ठाम , हे असं असं*
*या उलट अस्पष्ट म्हणजे*
*अनिर्बंध .. अज्ञात, थोडंसं काहीतरी अंधूक*
*नूसतीच एखादी वाट*
*किंवा फ़क्त एक दिशा*
*किंवा कधी कधी फ़क्त एक "गट फ़िलींग"*
*अशा अस्पष्ट जाणिवांचा पाठलाग करण्याची वृत्ती*
*म्हणजे ° उनाड°*
*उनाड म्हणजे उगाच केलेला टाइमपास नव्हे किंवा तो*
*दिखाऊपणाही नाही*
*उनाड मध्ये नड आहे तशीच नडण्याची वृत्तीही आहे*
*चांगलं/ वाईट, नैतिक/अनैतिक अशा भिंतींच्या*
*खोलीबाहेर जे जग आहे ,जे तिसरं डायमेन्शन आहे ते*
*ज्याला गवसलं तो उनाड. इतरवेळी सपाट आयुष्यात*
*व्यस्त असणार्यांसाठी ई-साहित्य तर्फ़े*
*हा   थ्री-डी चश्मा   ☺*
*- आनंद माने  (संपादक )*

# उनाड

## अनियत्कालिक


unaaad@gmail.com

esahity@gmail.com




कैलीग्राफी

**अमृता ढगे**

सर जेजे स्कुल औफ़ आर्ट

लेखन

**संहिता हिस्वनकर ( औरंगाबाद )**

**कौमुदी ( नाशिक )**

**नाम गुम जायेगा ( ठाणे )**


© या अंकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित



चैत्र प्रतिपदा ( २३ मार्च २०१२ )

# आउट ऑफ़ द बॉक्स

*- संहिता हिस्वनकर*

माझ्या डायरीच्या पानाच्या अग्रभागी  हे वाचलं, “हे म्हणजे जरा जास्तच झालं. आता शिर्षकच ‘आउट ऑफ़ बॉक्स’ दिलंय म्हणजे तर मग पुढे काय अपेक्षा करावी ?” इति हितचिंतक!

म्हणून मग आता एक बॉक्सच मी घेऊन आले आहे. आणि मग समोर ठेऊन म्हणते, आऊट ऑफ़ बॉक्स चं दे सोडून आता इन द बॉक्स थिंक करा.

एक बॉक्स ठेवला समोर. आणि विचारलं की सांगा, काय असेल या बॉक्स मध्ये? आणि हो, जे डोक्यात येईल ते खरं खरं सांगा. उगाच मुद्दाम विचार करू नका. ओळखायचा प्रयत्न ही करू नका, फ़क्त कल्पना करा. जर तुमचा एखादा बंद बॉक्स असेल तर त्यात तुम्ही काय ठेवलं असावं ?

हितचिंतका, कर बाबा, कर ,
कल्पना कर बंद बॉक्स टेप
लाऊन सील केलेला , काय
असेल त्यात ? डोकं खाजवायचं नाय,
इच्चार करायचा नाय, हे म्हणजे आपले ते हे
असतात ना, ‘सायको ॲनेलिसिस’ तसं
काहीतरी. ट्राय देऊन पहा राउ... मंग पहा...

काय असेल बॉक्स मध्ये ?

१ जेवण ( भुक्कड हितचिंतकाचे पहिले उत्तर )

२ कपडे ( हितचिंतकाची ‘लेडी फ्रेंड’ म्हणे, हे फ़ार कमी वापरते )

३ दागिने ( आता हे त्याचे स्वतःचे, की त्याच्या तिचे त्यालाच ठाऊक )

४ पुस्तकं ( कालीजात तर आम्ही जात न्हाय? मग पुस्तकाचं काय काम ? बंद बॉक्स मध्ये बंद केले )

५ पांघरूण ( डोक्यावरून
ओढून झोपायला की त्याच्या
खाली लपायला ?)

६ रोकड ( हां ... हे म्हणजे
कसं ‘मेक्स सेन्स’ )

७ टेडी बेअर ( अस्वलं , मग ती क्युट का
असेनात , हवीतच कशाला )

८ गिफ़्ट ( खूप गोष्टी होलसेल मध्ये घ्या आणि
लपवा, तिला आठवड्याला एक गिफ़्ट लागत
असावं )

९ मुडदा ( ‘ती’ च्या भावाचा ? आता हितचिंतक
वैतागला दिसतो )

१० राख ( अरे बाबा शांत हो... कुल डाउन बडी
)

११ फ़ुलं ( आता मी कन्फ़्युज झालेय , प्रेतासाठी
की प्रियेसाठी ?)

१२ शब्द ( बापरे ! हा पण लेखक मोड मध्ये
येणार की काय ? )

१३ अर्थ ( एक्सप्लेनेशन :
शब्द आणि अर्थ म्हणे कोंडून
ठेवलेत, आता पुढचं उत्तर
'वाक्य' देऊ नको बाबा !!)

१४ विचार ( हा तर सिरियस
झाला !! फ़िलोसॉफ़ी !!!)

१५ आत्मा ( बस्स! मी हात टेकले. अजून नाही
विचारणार. आता पुढचा विचार )

हं ठिके आता इन द बॉक्स चा विचार तर झाला
, आता मी ही वरची यादी (कंसातल्या टीपा
वगळून अर्थातच) सरळसरळ इथे लिहते

जेवण, दागिने, कपडे, पुस्तकं, पांघरूण, रोकड,
टेडी बेअर, गिफ़्ट, मुडदा, राख, फ़ुलं, शब्द,
अर्थ, विचार, आत्मा

या यादीतल्या कुठल्याच गोष्टीचा वरकरणी
कुठल्याच गोष्टीशी अर्थाअर्थी संबंध नाही पण
तरीही माझ्या हितचिंतकाने या सगळ्या गोष्टी
एकाच बॉक्स मध्ये बंद केल्या. त्याही एकत्र , का
केल्या असाव्यात ? काहीतरी संबंध तर असावा
? पण नाही.

मग मी मेंदूने विचार केला.
आणि एक वाक्य जमलं

**“ तसं विचार करता, जेवण, कपडे,दागिने, रोकड हे सगळं मागे सोडून, कफ़न पांघरून ठेवलेल्या मुडद्याला रास्त्र वाहा की फ़ुलं वाहा, शब्दाचाही फ़रक पडत नाही, नि त्यात काही अर्थ नाही. तर उगाचं टेडी बेअर आणि गिफ़्ट वगैरेंनी शरीराचे चोचले कशाला ? पुस्तकं घ्या, विद्या घ्या, आत्म्याचे चोचले पुरवा, तो अनादि अनंत आहे”**

हितचिंतक चाट!! “ आयला! खरंच की !!” माझ्या बॉक्स मध्ये असं काही आहे ? असू शकतं ? हा विचार चेह-यावर स्पष्ट. आणि मग हळूच, एक गोष्ट त्याला सांगितली. “ बाबारे, हा बॉक्स नाही नुसता रिकामा! त्यात काहीतरी खास असतं किंवा अनादि आणि अनंत खास गोष्टी असतात. वरकरणी त्याचा अर्थाअर्थी संबंध लागत नाही. पण प्रत्येक जण या गोष्टी कवटाळून फ़िरतो. कारण त्याला कळला नाही तरी वर बसलेल्याला त्यांचा अर्थ कळतो.

प्रत्येकच जण हा बॉक्स डोक्यात
घेऊन फ़िरतो. आणि हा
बॉक्सच नसेल तर माणूस
माणूस राहणार नाही. हा
बॉक्सच विचित्र गोष्टींना एकत्र
आणतो, नवी बंधने बांधतो, नवे संबंध दावतो
... प्रत्येक माणसाकडे हा बॉक्स असतो आणि
माणूस त्याला “माझा मेंदू” म्हणतो. अशा प्रकारे
इन्साईड द बॉक्स असलेलं सगळंच थिंकिंग,
‘आऊट ऑफ़ द बॉक्स’ असतं”

नॅशनल जियोग्राफ़िक चॅनल नावाचं एक प्रकरण
ईडियट बाक्स ने माझ्या डोक्यात भरलं. त्यावर
सगळं हे असच दाखवतात. माईंड गेम्स या
गोंडस नावाखाली माझ्याच मेंदूचे चमत्कार माझेच
पैसे घेऊन मलाच दाखवणारं हे प्रकरण भलतंच
चमत्कारिक आहे. विचार, भावना आणि इच्छा
आकांक्षांचं माझं हे ब्रह्मांड बॉक्स मध्ये बंद होत
आहे. केलं जात आहे. आणि गम्मत म्हणजे मला
या गोष्टीचा राग नाही, उलट गम्मत वाटते.
माझा हितचिंतकही हेच म्हणतो

( माझ्या म्हणण्यात थोडंफ़ार
तथ्य असतं हे पटलं आहे त्याला )

“ हा बॉक्स आपल्या टॉप
बॉक्स ला चालवून -हायलाय भिडू?
ते जे दाखवतात ना तसंच काहीसं
माझ्या मेंदूत चालत राहतं कित्येक तास पुढे,
म्हणजे अगदी सास बहू सिरियल तर कधी
विनोद दुआ लाईव्ह?” (आता हा चक्क स्वतःचे
विचारपण करू-मांडू लागला )

आणि खरंच होतं तसंच आपल्या टॉप बॉक्स ला
थोडं काही खाद्य द्या, त्यातून तो बॉक्स अगदी
जादूच्या गोष्टी बाहेर काढतो. फ़क्त टीव्हीच नाही
अगदी रोजच्या छोटूकल्या पिटूकल्या गोष्टींतून
सुरू झालेले सरळ विचार पाहता पाहता अक्राळ
विक्राळ रूप धारण करतात. कुठल्याही गोष्टीचा
संबंध अगदी कुठल्याही गोष्टीशी लागतो.
काहीतरी स्पायडरमॅन चं जाळं तयार होतं, आणि
कुठल्याकुठे आपण जाऊन पोहचतो.

आणि सगळ्यात सुंदर अनुभव म्हणजे आपल्या
टॉप बाक्स ची आउट ऑफ़ द बॉक्स कलाकारी

काहीशा तटस्थ दृष्टीने पहात
राहणं, आणि हे जाळं विणत
जात असताना त्याला पाहून
मनापासून हसणं.

# द अल्केमिस्ट "प्लस"

*"It is not social work for me.*
*It is my 'spiritual journey'*

म्हणूनच अजून खूप काही करायचं
आहे. साधना तर रोजच करायची असते ना!"
आयुष्यात पहिल्यांदाच इतकं कानात प्राण आणून
ऐकत होते. शब्दांना खूप खूप खर्चायची सवय
असणारी मी शब्द शब्द साठवून ठेवत होते.
६ ऑगस्ट २०११ च्या सभेत अधिक कदम बोलत
होते. *"THE Adhik Kadam" . . .*

*आम्ही सगळे* BWF*(बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन)*
*वाले ज्या सीमारहित जगात actually जगतो,*
*त्याचा उद्गाता अधिक कदम . . . अधिक सर . .*
*. काश्मीर मधल्या आमच्या २०० पोरींचा*
*अधिक भैया . . पापा आणि साऱ्या TEAM BWF*
*चा "अधिक दादा". . .*
*त्यांचं डोंगराएव्हढं काम पाहून सारेच भारावून*
*जातात. एकच प्रश्न असतो सगळ्यांच्या*
*चेहऱ्यावर* ***How did you do it?*** *त्यांची ही सफर*
*खऱ्या अर्थानं suffer च होती.*



आता जे दिसतंय त्यासाठी
१४ वर्षांचा वनवास भोगलाय
या रामानं. . . पण पाहिलंत ना
जर तुम्ही त्यांच्याकडे तर
चिंतेची इतकुशी रेषही दिसणार
नाही.

*He is the most coolest and hottest identity ever been.*

या "प्लस" कदमनं काश्मीर खोऱ्यातल्या
आतंकवादी कारवायांनी जगणं हरवलेल्या
पोरींच्या आयुष्यातून दु:खाला कायमचं
मायनस करून टाकलं.

**खुशियोंके इतने "कदम " उनकी
जिन्दगीमें हैं की अभी कोई गम
यहाँका रुख नहीं कर सकता।**

अर्थातच यामागे खुप कष्ट आहेत
त्यांच्याच शब्दात सांगायच तर

**“वेदनांचा परमोच्च बिंदू सुखाचं
संसाधन ठरलाय”**

अधिक महाराष्ट्रातल्या श्रीगोंदा
मधल्या शेतकऱ्याचा मुलगा.
पुण्यात राज्यशास्त्राचा अभ्यास
करतांना सीमाभागातील प्रश्न
आणि परिस्थिती या विषयाच्या
उत्सुकतेनं त्यांना काश्मीरमध्ये अक्षरशः खेचून
नेलं. तिथल्या परिस्थितीचा अभ्यास करतांना
काम करतांना परिस्थितीची अनेक भयानक
विदारक रूपं समोर येत ती कशाचीतरी
प्रेरणाही मिळत होती, आणि इतकी विघातक
आश्चर्य पाहून मन खचतही होतं. तिथल्या त्या
वास्तव्यात १३ वर्षांचा एक मुलगा सूसाइड बॉम्बर
म्हणून मेला हे अधिकनी पाहिलं . . .१९ वर्षांच्या
संवेदनशील तरुणाला मुळापासून हादरा
देणारा हा प्रसंग अधिकच्या आयुष्याला
कलाटणी देणारा ठरला . त्या रात्री अधिक धो
धो रडले आहेत. त्यांच्या अश्रूंतून जणू सारी
विचारगंगा प्रवाहित झाली आणि ठरलं. . .
आता जे काय करायच ते इथेच आणि
यांच्यासाठीच . . . त्या क्षणापासून काश्मीर
अधिकच आणि अधिक काश्मीरचे झाले.

सोपं नव्हतच.
संघर्षाला आता कुठ सुरुवात झाली होती. ज्यांच्यासाठी काम करायचं आहे तेच मदत स्वीकारायला तयार नव्हते .
कोण कुठला परक्या धर्माचा 'भारतातून' आलेला पोरगा काश्मीरमध्ये काम करतोय! कसं शक्य आहे? चांगली माणसं तोपर्यंत सामान्य काश्मिरी जनतेन जवळपास पहिलीच नव्हती. त्यांच्या हृदयातला संशय दूर करून त्यांना जवळ करायचं होतं. अधिकच्या प्रेमाने आणि अथक परिश्रमाने ते साध्य झालं. त्यांच इतक निरलस काम पाहून लोक त्यांच्या पाठीशी इतके घट्ट उभे राहिले कि काश्मीर मधलं प्रत्येक घर त्यांचं घर झालं. तिथल्या मुल्ला मौलवींनी अधिकविरुद्ध फतवे काढले तरीही गावच्या गाव अधिक मागे खंबीरपणे उभं होतं.

काश्मीरची एकूण परिस्थिती पाहता वयाने लहान असणाऱ्या अनाथ निराधार मुलींसाठी सुरक्षितता देणारं, आधार ठरणारं, आयुष्य घडवणारं असं काहीच संसाधन उपलब्ध

नव्हतं. त्यामुळे मुलींसाठी
काम करणं ही परिस्थितीची
मागणी आणि प्राथमिकता
देखील होती. त्यासाठी
अधिकने  देशाची, धर्माची
कुठलीही सीमा न मानणारी संस्था
उभी केली. प्रेमाचं आणि माणुसकीचं विशाल
आभाळ असणारी. . .
"बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन". . . BWF.
BWF चं पहिलं घर सुरु झालं कुपवाऱ्यामध्ये.
त्याचं नाव ठेवलं गेलं "बसेरा ए तबस्सुम"
आनंद देणारं घर. . .

या घरात मुली आपलं घर म्हणून राहू लागल्या. एका घरात आई बाप मुलींची जशी काळजी घेतात तीच काळजी या घरात घेतली जाते. त्यांचं राहणं, खाणं, शारीरिक आणि मानसिक आरोग्य, शिक्षण आणि मुख्य म्हणजे सुरक्षितता. बहुतांश मुली मुस्लीम आहेत आणि त्या खुलेपणाने त्यांच्या धर्माचं आचरण करू शकतात. मुळातच ही घरं म्हणजे घरटी आहेत त्यांची. पुन्हा त्यांना त्यांच्या लोकांमध्ये,

त्याच समाजामध्ये जायचं आहे.. त्या दृष्टीने मुलींना सक्षम करण्याचा काम BWF ची घरं करतात. परंतु मुलींची बाब मुळातच इतकी संवेदनशील असते कि त्यावरून स्थानिक लोकांचा विरोध झाला तर नवल नाही . . विरोध देखील किती? तर तब्बल १९ वेळा अतिरेक्यांनी अधिकला उचलून नेलं. To shoot him dead. त्याची माणसांबद्दलची आत्मियता, प्रेम, सच्चेपणा आणि कार्याची आत्यंतिक ओढ त्याला जिवंत परत घेऊन आली आणि केवळ इतकंच नव्हे तर कट्टर जिहादी अतिरेकीसुद्धा त्याला ईश्वरी शक्ती मानतो आहे . . .

अधिक म्हणतात त्याप्रमाणे "ते मला मारत नाहीत हे त्यांचं सहकार्यच आहे माझ्यासाठी"

जळून खाक झालेल्या झालेल्या रानात हिरवळ उगवण्याचा चमत्कार त्यांनी करून दाखवला आहे.

आज मितीला थोड्या थोडक्या नव्हे तर तब्बल २०० मुली अधिक आणि त्यांची "बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन" सांभाळते आहे. . .माया ममता

देणारी, ओलाव्याने रसरसलेली
४ घरं कुपवारा, बिरवा,
अनंतनाग आणि जम्मू इथे
उभी राहिली आहेत. आणि
आता तर ५०० मुली राहतील
असं होस्टेल उभारण्याचा अधिकचा मानस
आहे . . .त्यासाठी ट्रस्ट च्या माध्यमातून १.५
एकर जागा घेऊन झाली आहे .

आजमितीला देशातून आणि परदेशातून
देखील BWF ला मदत होते आहे. . .अधिकच्या
कामात शेकडो हात काम करतायत आणि
हजारो लाखो हातांची गरज आहे. बोलता
बोलता अधिकच एकदा म्हणाले होते "मला जे
करायचं आहे त्याच्या एक टक्का सुद्धा अजून
मला साधलं नाहीये." म्हणजे विचार
करण्यासारखं आहे. . काही असो पण
आज अधिक आपल्या साऱ्यांच्या वतीने
काश्मिरी जनतेला विश्वास देत आहेत. . .
सीमाभागात या देशासाठी तुम्ही जे काय
सोसताय त्यामध्ये आम्ही सारे भारतीय
तुमच्या सोबत आहोत. तुमच्या पोराबाळांची
जबाबदारी तुमच्या इतकीच आमचीही आहे.

अधिक त्या पोरीचं नशीब
ठरलेत . . . "मक्तुब" झालेत . . .
उध्वस्त समुद्रांना सांधण्याची
किमया त्यांनी केली आहे .
खऱ्या अर्थानं ते किमयागार
आहेत. . .
He is the one and only "Alchemist" for
the girls . . . Bravo Adhik . . .
परमेश्वर तुम्हाला सामर्थ्य देवो . . .

कौमुदी
*BWF NASIK.*




# स्टीव्ह जॉब्ज यांचे

# कॉलेज विद्यार्थ्यांसमोर भाषण

जगातल्या एका नामवंत युनिव्हर्सिटीतून यशस्वी होऊन बाहेर पडत असताना तुम्ही मला इथे पाहुणा म्हणून बोलावलंत हा माझा बहुमान आहे. मी कधीच ग्रॅज्युएट झालो नाही. खरं सांगायचं तर मी कॉलेज ग्रॅज्युएशनच्या आजच्या इतका जवळही कधी पोचलो नाही. तेव्हा मी भाषण उपदेश वगैरे काही करणार नाही. फ़क्त तीन गोष्टी सांगेन. माझ्या आयुष्यातल्या तीन साध्या घटना. अगदी साध्या. बस्स.

मी रीड कॉलेज मध्ये शिकायला गेलो आणि सहा महिन्यांतच बाहेर पडलो. त्याचं काय झालं ते सांगतो.



या सगळ्याची सुरुवात
माझ्या जन्मा आधीच झाली.
माझी खरी आई एक
बिनलग्नाची कॉलेजविद्यार्थिनी
होती. त्यामुळे मला कुणाला तरी
दत्तक देणं भाग होतं. तिची
बिचारीची एकच इच्छा होती, मला शिकलेले,
ग्रॅज्युएट आईबाप मिळावेत. त्यामुळे एका
संस्थेच्या मदतीने तिने एका वकील जोडप्याला
मला दत्तक घ्यायला तयारही केलं. पण त्यांना
हवी होती मुलगी आणि हिला झाला मुलगा
(म्हणजे मी). तेव्हा ते काही मला घ्यायला
तयार होईनात. आणि दुसरे जे भेटले ते काही
ग्रॅज्युएट नव्हते. ग्रॅज्युएट तर सोडाच शाळा
शिक्षणही पुरे झालेले नव्हते. तेव्हा माझी आई
काही तयार होईना. असेच महिने गेले. शेवटी
या दुसऱ्या जोडप्याने मला ग्रॅज्युएशन पर्यंत
शिकवण्याची खात्री तिला दिली. पटवलंच.
आणि तिने मला त्यांच्या हवाली केलं.

आणि करता करता मी सतरा
वर्षांनंतर खरंच कॉलेजात
पोहोचलोही. पण मी असा
बावळट की एक भयानक
महागडं कॉलेज मी निवडलं.
माझे हे आई वडील कष्टाने पैसे कमवत आणि
मी ते फ़ीवर उडवत होतो. सहा महिन्यांतच
माझ्या मनाला हे पटेना. या शिक्षणात काहीच
दम दिसेना . आपल्या आयुष्यात आपण काय
करणार याचा मला काहीच अंदाज येत नव्हता
आणि त्यात कॉलेजात शिकून काय मिळणार
याचा काहीच अंदाजच येईना. माझ्या
आईवडलांनी आयुष्यभरात खपून साठवलेले
पैसे या फ़ालतू शिक्षणावर उडवणं मला
पटेचना. तेव्हा शेवटी मी कॉलेज दिलं सोडून.
या आयुष्यात काहीतरी करूच असं वाटत होतं.
त्या क्षणी भिती वाटली काही वेळ. पण आता
वाटतं की माझ्या आयुष्यातला हा सगळ्यात
योग्य निर्णय होता. कॉलेज सोडल्यावर
माझ्यावरचं ते बोअरिंग लेक्चर्स अटेंड
करण्याचं दडपण निघून गेलं आणि आवडत्या
गोष्टी करायला भरपूर वेळ मिळाला.

खूप मजेदार वगैरे नव्हतं ते. एकतर माझ्याकडे घरच नव्हतं. मित्राच्या खोलीत जमिनीवर पडायला जागा मिळाली होती. कोकाकोलाच्या रिकाम्या बाटल्या जमा करून विकायचो आणि पोट भरायचो. हरे कृष्ण मंदिरात फ़ुकट जेवण मिळतं म्हणून सात मैल चालत जायचो. पण ते आयुष्य भन्नाट होतं. या काळात मी कुतुहल आणि मनसोक्तपणे जे जे केलं त्यानेच माझं आयुष्य घडवलं. एक उदाहरण देतो.

रीड कॉलेजात कॅलिग्राफ़ीचे मस्त क्लासेस होते. सगळ्या कॅंपसभर छान छान पोस्टर्स, ड्रावर्स, लेबल्स दिसायची. नाहीतरी मला दुसरं काहीच काम नव्हतं तेव्हा मी हे क्लास जॉईन केले. मी सेरिफ़ आणि सॅन सेरिफ़ मध्ये अक्षरं कशी काढायची ते शिकलो, वेगवेगळ्या अक्षरांमध्ये अंतर आणि प्रमाणबद्धता कशी ठेवायची आणि सुंदर अक्षर कसं काढायचं ते शिकलो. हे एकदम सुंदर, झक्कास आणि कलाकारीचं काम

होतं, त्यात शास्त्रांची वगैरे
फ़ार कटकट नव्हती.
माझं मन त्यात रमलं.

अर्थात या हौशी उद्योगाचा
आयुष्यात काही उपयोग होईल
अशी अंधुक सुद्धा आशा त्यावेळी मला नव्हती.
जस्ट टाईमपास म्हणून करत होतो. पण दहा
वर्षांनी जेव्हा आम्ही मॅकिंटॉश कॉम्प्युटर
बनवायला घेतला तेव्हा त्याचा मला उपयोग
झाला. कॉम्प्युटर मध्ये प्रथमच एक सुंदर
टायपोग्राफ़ी अवतरली. आणि विंडोज ने मॅक
कॉपी केल्यानंतर जगभरच्या सगळ्या
कॉम्प्युटरवर हा सुंदर फ़ॉंट आला. म्हणजे बघा,
मी जर कॉलेजला रामराम ठोकला नसता तर
तर जगाला हा सुंदर टाईप मिळालाच नसता.
अर्थात कॉलेज सोडताना काही मला याची
कल्पना नव्हती पण दहा वर्षांनंतर हे जाणवलं.

*असंच असतं. जेव्हा आपण निर्णय घेत असतो तेव्हा पुढे काय होणार आहे याची कल्पनाच नसते. पण आपण विश्वास ठेवून निर्णय घ्यायचा असतो, की आज जे करतो आहोत त्याचं प्रतिबिंब कधी ना कधी उमटेलच आयुष्यावर.  आतला आवाज, नियती, कर्मा काही हवं ते म्हणा. पण या विश्वासाचा मला आयुष्यभर उपयोग होत आला आहे. आणि आज मी जो काही आहे तो या विश्वासाने घेतलेल्या निर्णयांमुळेच आहे.*

**माझी दुसरी गोष्ट आहे प्रेम आणि तोट्याची.**

*माझं नशीब चांगलं म्हणून मला माझं प्रेम विसाव्या वर्षीच उलगडलं. वोझ आणि मी मिळून वयाच्या विसाव्या वर्षीच आमच्या घरच्या गॅरेजमध्ये ऐपल कंपनी सुरू केली. आम्ही खूप मेहनत केली आणि दहा वर्षांत ही दोन माणसांची कंपनी ४००० कर्मचारी आणि हजार करोड टर्न ओव्हरवर नेऊन ठेवली.*

माझ्या वयाच्या एकोणतिसाव्या
वर्षी आमचा सुंदर मॅकिंटॉश
कॉम्प्युटर बाजरात आला आणि
- तिसाव्या वर्षी मला माझ्याच
कंपनीतून हाकलण्यात आलं.

म्हणजे बघा. मीच सुरू केलेली कंपनी. त्यातून
मलाच हाकलला. आमची कंपनी जसजशी
वाढत गेली तसं आम्ही एक हुषारसा माणुस ही
कंपनी सांभाळायला मदत म्हणून घेतला. एक
वर्षं तर चांगलं गेलं. पण नंतर  कंपनीच्या
भवितव्याबद्दल आमची मतं जुळेनात. शेवटी
भांडणं चव्हाट्यावर आली आणि कंपनीच्या
इतर बोर्ड डायरेक्टरनी त्याचीच बाजू उचलून
धरली आणि मला चक्क हाकललं.  मी तेव्हा
तीस वर्षांचा होतो, आणि जगातून
उठल्यासारखाच होतो. माझ्या आयुष्यभर
ज्याच्या मागे रक्त आटवलं ते हातून निसटलेलं.
पुरता उद्ध्वस्त झालो होतो.

हो ना करत पुढचे काही महिने
असेच गेले. मला सारखं
असं वाटे की मी माझ्यावर
जबाबदारी टाकणाऱ्या माझ्या
आधीच्या उद्योजकांचा अपराधी
आहे. त्यांनी माझ्यावर सोपवलेल्या
कार्याचा मी चुथडा करून टाकला होता. म्हणून
मी एकदा डेव्हिड पॅकार्ड आणि बॉब नॉईस
यांची माफ़ीही मागितली. मी जगाच्या नजरेतून
उतरलो होतो आणि अनेकदा व्हॅलीतून पळून
जायचा विचारही माझ्या मनात आला. पण हळू
हळू माझ्या डोक्यात प्रकाश पडायला लागला.
मी जे केलं तेच माझं आवडतं काम होतं आणि
काहीही घडलेलं असलं तरी माझी आवड अजून
तशीच होती. मला जरी तिथून नाकारलं असलं
तरी माझ्या आवडीचं काम तेच होतं की. तेव्हा
मी ठरवलं की पुन्हा एकदा नव्याने सुरूवात
करायचीच.

‘त्यावेळी जरी मला दुःख झालं तरी आता सांगतो की ऐपलमधून हाकलला जाणं हा माझ्या आयुष्यातला सर्वात मोठा फ़ायद्याचा सौदा होता. यशाचं ओझं खांद्यावरून गळून पडलं आणि नवीन काहीतरी करायला मी एकदम हलका झालो. आता पुढे काय होणार काहीच माहित नव्हतं. त्यामुळे माझ्या कल्पकतेला अचानक उधाण आलं.

पुढच्या पाच वर्षांत मी NeXT आणि Pixar अशा दोन कंपन्या सुरु केल्या आणि एका विलक्षण मुलीच्या प्रेमात पडून लग्नही केलं. पिक्सर मार्फ़त जगातली पहिली कॉम्प्युटर कार्टून फ़िल्म : Toy Story आम्ही बनवली. आणि आता तो जगातला सर्वात मोठा भारी animation स्टुडिओ आहे. योगायोगाने ऐपलने नेक्स्ट विकत घेतली, मी परत ऐपलमध्ये आलो, आणि नेक्स्ट मधलं तंत्र आता ऐपलचा आधार आहे. लॉरीन आणि माझा संसारही सुखात चालू आहे.

ऐपलनं मला हाकललं नसतं
तर यातलं काहीच मी केलें
नसतं याची मला पक्की खात्री
आहे . भयंकर औषध होतं ते.
पण गरजेचं होतं. आयुष्य कधी
कधी डोक्यात वीटच हाणतं. पण श्रद्धा सोडू
नका. मी जे काही करू शकलो त्याचं एकच
कारण होतं. ते म्हणजे, मी जे काम करत होतो
ते माझ्या आवडीचं होतं. आपल्याला काय
आवडतं हे आधी कळलं पाहिजे. हे प्रेमात
जितकं महत्त्वाचं आहे तितकंच कामातही.
तुमच्या कामात तुम्ही तुमच्या आयुष्यातले
सर्वात जास्त तास खर्च करता. ते तुमच्या
आवडीचंच असलं पाहिजे. आपण करतोय हे
फ़ार भारी काम आहे असा विश्वास असायला
हवा. तुम्ही तुमच्या कामाच्या प्रेमात पडा. अजून
जर सापडलं नसेल तर शोधा. तुमच्या
हृदयातून आवाज येईल. अंतर्मन सांगेल
तुम्हाला. आणि एकदा का असं काम तुम्हाला
मिळालं की वर्षं कशी छान सुंदर जातील.
म्हणून म्हणतो.
मनाजोगतं काम मिळेपर्यंत थांबू नका.

**माझि तिसरी गोष्ट आहे मृत्युबद्दल.**

सतरा वर्षांचा असताना एक वाक्य वाचलं होतं. रोज उठल्यावर म्हणा की "आजचा दिवस शेवटचा आहे. एक ना एक दिवस हे खरं होईल." मला हे पट्लं. गेली तेहतीस वर्षं मी सकाळी आरशा समोर उभा राहून स्वतःलाच विचारतो," जर आजचा दिवस हा माझ्या आयुष्यातला शेवटचा दिवस असेल तर आज मी जे करायचं ठरवलंय तेच करीन?". जर माझ्या मनाने "नाही" म्हटलं तर मी विचारात पडतो. असेच काही दिवस गेले की मी बदल घडवायला घेतो.

आयुष्यात काही मोठं करण्यासाठी मी जर काही वापरलं असेल तर हा विचार "आपलं आयुष्य कधीही संपू शकतं". एका मृत्युसमोर बाकीचे सगळे विचार, सगळी भिती, सगळा संकोच, सगळा मान अभिमान अपमान, सगळी लाज सगळं सगळं फ़ालतू ठरतं आणि जे खरोखर महत्त्वाचं असेल ते आपोआप

समोर येतें. एकदा आपण मरणारच आहोत हे स्पष्ट झालं की आपण काय गमावणार वगैरे विचार गौण होऊन जातात. परिस्थितीसमोर आपण पुरते नंगे झालेले असतो. आपल्या मनाप्रमाणे वागायला पूर्ण मोकळे.

गेल्या वर्षीचीच गोष्ट. डॉक्टरांनी माझी कॅन्सरसाठी टेस्ट केली. सकाळी साडे सात ची वेळ. स्वादुपिंडातला ट्युमर स्पष्ट दिसत होता. डॉक्टरांनी हात वर केले. हा कॅन्सर बरा होण्यातला नाही म्हणून सांगितलं. तीन ते जास्तीत जास्त सहा महिने . बस्स. माझ्या डॉक्टरांनी मला घरी जाऊन पुढच्या व्यवस्थेला लागायला सांगितलं सुद्धा. त्याचा अर्थ हा की आता मुलाबाळांना सांगा काय काय ते.

या आजाराचं टेन्शन घेऊनच मी तो संपूर्ण दिवस काढला. संध्याकाळी एक टेस्ट झाली. माझ्या घशातून एक नळी घालून पोटातल्या आतल्या भागातून स्वादूपिंडात एक सुई घालून एक सॅंपल बाहेर काढलं. मी तर बेशुद्धच होतो.

पण माझ्या बायकोने मला
नंतर सगळी गोष्ट सांगितली.
जेव्हा हे सॅंपल बाहेर काढलं
आणि सूक्ष्मदर्शक यंत्रात पाहिलं
तर डॉक्टर रडायलाच लागले.
कारण स्वादुपिंडाचा हा कॅन्सर अगदी वेगळा
होता आणि बरा होण्याजोगा होता. लवकरच
माझं ऑपरेशन झालं. मी आता पूर्ण बरा आहे.

मृत्युला मी इतक्या जवळून प्रथमच पाहिलं
आणि आशा आहे की आणखी काही दशकं
मला तो भेटणार नाही. पण आता जे मी
तुम्हाला सांगतोय ते मी आधी सांगू शकलो
नसतो. कारण तेव्हा मी मृत्युकडे छान छान
बौद्धिक पातळीवरच पहायचो पण आता
त्याच्याकडे एक शाश्वती म्हणून बघतो.

मरण कोणालाच नको असतं. अगदी स्वर्ग
स्वर्ग म्हणत तळमळणाऱ्यांनाही मरायची
तयारी नसते. आणि तरीही आपण सगळे नक्की
मरणार आहोत. आजवर तरी कोणी सुटला
नाही मरणातून. आणि तेच चांगलं आहे. मृत्यु
हा जीवनातला सर्वात भारी शोध आहे. त्यामुळे

जुनं जाऊन नव्याला जागा
होते. आताच्या घडीला तुम्ही
नवीन आहात. पण लवकरच
तुम्हीही जुने व्हाल आणि
तुमचीही निघायची वेळ येणार
आहे. हे असं नाटकासारखं बोलायला मला
आवडत नाही पण भावांनो हेच अंतिम सत्य
आहे.

तुम्हाला मोजकाच वेळ आहे. तो दुसऱ्या कुणाचं
तरी जीवन जगण्यात दवडू नका. दुसऱ्यांच्या
विचारांत जगणं सोडून द्या. तुमच्या आतल्या
आवाजावर दुसऱ्यांच्या मतांच्या गलक्याला
भारी पडू देऊ नका. स्वतःच्या मनाप्रमाणे
जगायची हिंमत बाळगा. तुमचं हृदय आणि
अंतर्मनाचं सामर्थ्य ओळखा. त्यांच्या
मतासमोर बाकी सगळं गौण आहे.

मी लहान असताना
एक whole earth catalogue
नांवाची पुस्तकमालिका
निघायची. माझ्या पिढीचं ते
बायबलच म्हणा ना. इथलाच
एक  स्टुअर्ट ब्रॅंड नांवाचा माणुस ती काढायचा.
त्याची ती सुंदर काव्यमय भाषा सगळ्या
साध्या साध्या माहितीलाही जिवंत करायची.
गुगलच्या आधी ३५ वर्षांपुर्वी ते एक गुगलच
होतं. खुप सुंदर, खुप प्रभावी, अत्यंत साध्या
पुस्तकांची मालिका.

स्टुअर्ट आणि त्याच्या मित्रांनी ती पुस्तकं
बरीच वर्षं चालवली. आणि जेव्हा ते बंद
करायची वेळ आली तेव्हा त्याच्या शेवटच्या
अंकावर , एक सुंदर गावरान पायवाटेचं चित्र
टाकलं आणि त्याच्या खाली लिहिलं


“भुकेले रहा, **उनाड** रहा”
त्यांचा तो शेवटचा मेसेज होता.

STAY HUNGRY, STAY FOOLISH.

मी माझ्या जीवनाचा तो मंत्र बनवला. आणि आज जेव्हा तुम्ही तुमच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवता आहात , मी तुम्हाला हाच मंत्र देतो.

STAY HUNGRY, STAY FOOLISH

धन्यवाद.



# ई साहित्य प्रतिष्ठान

जगभर पसरलेल्या बारा
कोटी मराठी भाषकांना
इंटरनेटवर जोडण्याचं एक
स्वप्न. आज ना उद्या मराठी
भाषा आणि मराठी भाषिक जगावर
राज्य करतील हे स्वप्न. आणि मराठी
माणसासारखा जिद्दी माणूस जगाच्या पाठीवर
नाही हे वास्तव. मराठी भाषेसारखी गोड
भाषा जगाच्या पाठीवर नाही हे वास्तव.
सह्याद्रिच्या खडकांतून आणि कृष्णा कोयना
गोदावरीच्या पाण्यातून आलेले हे गुण. या भाषेच्या
साहित्याला उज्ज्वल भविष्यकाळ आहे
या विश्वासाने काम करणारी संस्था म्हणजे
ई साहित्य प्रतिष्ठान.
२००८ पासून मराठी ई पुस्तकांची निर्मीती करणार्या
ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर सुमारे
दोनशे ई पुस्तकांची निर्मीती केली. प्रत्येक अमूल्य पुस्तक
सव्वा लाखभर लोकांपर्यंत विनामूल्य पोचवले. मराठी बाणा
जपणार्या उद्याच्या साहित्यिकांची ओळख संपूर्ण जगाला
व्हावी म्हणून प्रयत्न केले. शिवाजी महाराजांपासून ते संत
ज्ञानेश्वरांपर्यंत आणि

कुसुमाग्रजांपासून ते
महानोरांपर्यंत महान मराठी
बाण्याचा जागर चालवला.
ई साहित्यची पुस्तके विनामूल्य
मिळवण्यासाठी केवळ एक ई मेल
पाठवा. आणि स्वतःचा
आणि आपल्या मित्र आप्तांचा ई मेल आय डी
रजिस्टर करा.

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com